# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १६२–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. सुखदेव मारुती मोरे ,<br>मु. पो. जालीहाळ खुर्द, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार.

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सुखदेव मारुती मोरे, मु.पो. जालीहाळ खुर्द, ता. जत, जि. सांगली यांनी परिशिष्ट अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार वितरण कंपनी विरुध्द मंचाकडे तक्रार दि. १६.७.२०१० रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार यांनी जाळीहाळ खुर्द गट क्र. ५५/२ येथील शेतीपंपास नवीन विद्युत पुरवठा मिळणेसाठी वितरण कंपनीच्या कवठे महांकाळ विभागांतर्गत संख उप विभागाकडे अर्ज देवून प्रोसेसिंग फी रु.५०/– दि. १३.१.२००९ रोजी पावती क्रमांक ४३०३६४६ नुसार भरली आहे. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली.

यापूर्वी त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र.२२७ दि. २८.६.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे. अंतर्गत कक्षाने आदेश क्र. ७५३९ दि. १.७.२०१० नुसार आदेश पारीत करुन कृती मानके साध्य करण्यात अपयश आलेस ग्राहक भरपाई द्यावी असे आदेश दिले. त्याच्या नाराजीने सदरची तक्रार मंचाकडे प्रतिधीमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ७.८.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी वीज पुरवठा मिळावा म्हणून दि. १३.१.२००९ रोजी प्रोसेसिंग फी भरल्याचे मान्य केले आहे. त्यांना दि. २९.७.२०१० रोजी चलन देण्यात आलेले आहे. त्यांचे ०.७२ कि.मी. उच्चदाब वाहिनीचे काम आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. १७.८.२०१० रोजी सुनावणी घेतली असतां, तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. मैंलापुरे, प्रभारी सहाय्यक अभियंता, संख उप विभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता हजर. तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे यांनी तक्रारदार यांनी प्रोसेसिंग फी रु.५०/– दि. १३.१.२००९ रोजी भरल्याने त्यांना दि. १२.२.२००९ पर्यंत चलन देणे आवश्यक होते, ते दि. २९.७.२०१० ला देण्यात आले, तक्रारदार यांनी ते भरले आहे असे सांगितले. विलंबाबाबत कुठलेही स्पष्टीकरण नाही. तक्रारदार प्रतिनिधींनी जर वीज जोडणी मिळत असेल तर तक्रार मागे घेण्यास तयार असल्याचे मंचासमोर प्रतिपादन केले. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी विलंबाबाबत कुठलेही लेखी / तोंडी स्पष्टीकरण मंचासमोर दिले नाही. वि.प.ने ०.७२ कि.मी. उच्चदाब वाहिनी, १२ पोलचे काम आहे असे सांगितले. मंचासमोर चर्चेच्या ओघात सर्व्हीस कनेक्शन होवू शकते एल.टी. नाही, २५ केव्हीएचा १ टी.सी. बसविणार व त्यानंतर कनेक्शन देणार आहे असे सांगितले.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे भरपाई मिळण्यास ते हक्कदार आहेत काय ?

उत्तर : होय

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदार यांनी वि.प.कडे अर्ज देवून दि. १३.१.२००९ ला पैंसे भरल्याचे उभयबाजूंनी लेखी/ तोंडी विवेचनात मान्य केले आहे. तक्रारदार यांनी दि. १२.२.२००९ पर्यंत चलन मिळणे आवश्यक होते, ते त्यांना दि. २९.७.२०१० ला देण्यात आले आहे. त्यामुळे चलन देण्यास ७१ आठवड्यांचा विलंब झाले आहे. कृती मानके विनियम व परिशिष्ट अ प्रमाणे झालेल्या विलंबाबाबत प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे ७१ आठवड्यांचे रु. ७१००/– भरपाई मिळण्यास तक्रारदार हक्कदार आहेत. वि.प.कडे विलंबाबाबत कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही. कामाचे स्वरुप वि.प.ने ०.७२ कि.मी. उच्चदाब वाहिनी, १२ पोलचे काम आहे. मंचासमोर चर्चेच्या ओघात सर्व्हीस कनेक्शन होवू शकते एल.टी. नाही, २५ केव्हीएचा १ ट्रान्सफॉर्मर बसविल्यानंतर वीज जोडणी देण्यात येईल. तक्रारदार प्रतिनिधी यांनी वीज जोडणी एक महिन्यात होत असेल तर भरपाईचा हक्क सोडून देण्याची तयारी दर्शविली. तक्रारदार प्रतिनिधींच्या या प्रस्तावास वि.प. च्या अधिकाऱ्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे कृती मानकाचा भंग झाला असल्याने वितरण कंपनी ग्राहक भरपाई देणेस जबाबदार आहे. खालील प्रमाणे आदेश –

# आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीचा कवठे महांकाळ विभाग / संख उप विभाग यांनी दि. १२.२.२००९ ते २९.७.२०१० या कालावधीतील ७१ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ७१००/– भरपाई तक्रारदार यांस भरपाई द्यावी.

३) सदरची रक्कम २ बिलींग सायकलमधून समायोजित करण्यात यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(पूर्व),मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष